[16]

Ex. 27

# मे. दिवाणी न्यायाधिश साहेब 'व' स्तर गंगाखेड.


आर. सी. एस. नं:– 517/2023

वादी : गोविंद नरहरी मुंढे

**विरूध्द**

प्रतिवादी : मुख्यकार्यकारी अधिकारी व ईतर

वाद:– कायम मनाई हुकूम बाबत..



शपथपत्रातील मजकुर माइया सांगण्याप्रमाणे लिहण्यात आलेला असुन त्यावर माझी सही/अंगठा आहे. तो मी वाचुन पाहिला/मला वाचून दाखविण्यात आला. ते सत्य व बरोबर आहे.

## वादी तर्फे साक्षिदार क्रं. ०१ च्या सरतपासाचे शपथपत्र

मी वादी **गोविंद पि. नरहरी मुंढे**, वय:– 53 वर्ष, धंदा:– शेती, रा:–मरगळवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी शपथपुर्वक निवेदन करतो की, वादी व प्रतिवादी क्रं. 03 हे एकाच गावातील रहिवासी असुन प्रतिवादी हे वादीच्या वादग्रस्त शेतातील 11 आरच्या पश्चिमेकडिल व उत्तरेकडिल शेजारी आहेत. प्रतिवादी क्रं. 02 हे प्रतिवादी क्रं. 01 च्या अधिपत्याखाली काम करणारे शासकिय कर्मचारी आहेत.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.07.28 15:50:45 +0530

CJSD GANGAKHED.

सत्य शपथेवर पुन्हा सांगतो की, मौजे मरगळवाडी, ता:–गंगाखेड, जि:–परभणी मधिल सर्वे/गट क्रं. 303/7 मधिल एकुण क्षेत्रफळ 50 आर जे संपुर्ण वादी यांच्या नावाचे आहे. वादीचे वडिल नरहरी सटवाजी मुंढे यांनी दि:–13/07/1983 रोजी खरेदीखत क्रं. 515 नुसार रक्कम रू. 3000/– तीन हजार रूपयास रामराव माणीकराव मुंढे, वसंत रामदेव मुंढे, बालाजी रामराव मुंढे व निवृत्ती रामराव मुंढे यांच्याकडुन खरेदी घेतली होती. सदरील खरेदीखतानुसार फेरफार क्रं. 285 नुसार वादीचे वडिल यांच्या नावाने 7/12 ला नोंद झाली. तेव्हापासुन वादीचे वडिल हे सदरील शेतावर मालकी व ताबा ठेवून उपभोग घेत होते.

Superintendent
C.J.S.D.Court
Gangakhed
24/3/26

सत्य शपथेवर पुन्हा सांगतो की, त्यानंतर वादीचे वडील यांनी वादी यास सदरील वादग्रस्त जमिन मौजे मरगळवाडी, ता:–गंगाखेड, जि:–परभणी मधिल सर्वे/गट क्रं. 303/7 मधिल एकुण क्षेत्रफळ 50 आर जे संपुर्ण वादी यांच्या नावाचे आहे. सदरील जमिन ही वारसा फेरफार क्रं. 1057 अन्वये वादीच्या नावे करून दिली. सदरील फेरफार नुसार वादीचे नाव 7/12 वर आलेले आहे. वादी हा वादग्रस्त जमिनीवर मालकी व ताबा

ठेवून आहे. परंतु प्रतिवादी क्रं. 03 याने वादीच्या मालकी ताब्यातील 11 आर जमिनीवर 10 वर्षापुर्वी बळजबरीने दादागिरीने अतिक्रमण केलेले आहे. वादीने त्यांचे वडिल मयत झाल्यानंतर सदरील वादग्रस्त जमिन मोजुन तेथे पोल रवले होते. परंतु प्रतिवादी क्रं. 03 हे आडदांडवृत्तीचे असल्यामुळे त्यांनी रात्रीच ते पोल रवलेले काढुन टाकुन बळजबरीने अतिक्रमण केलेले आहे.

सत्य शपथेवर पुन्हा सांगतो की, वादीच्या वडिलांनी वादग्रस्त शेत हे खरेदी केलेले आहे. वादी हे सदरील खरेदीखताची नक्कल सदरील वादपत्रासोबत दाखल करीत आहे. म्हणुन वादी हे मौजे मरगळवाडी, ताः—गंगाखेड, जिः—परभणी मधिल सर्वे / गट क्रं. 303 / 7 मधिल एकुण क्षेत्रफळ 50 आर शेताचे कायदेशीर मालक व ताबेदार असल्याचे जाहीर करण्यात यावे.

सत्य शपथेवर पुन्हा सांगतो की, वरिल सर्व बाबींचा विचार केला तर, वादी यांच्या हक्कात प्रतिवादी क्रं. 01 ते 03 यांच्या विरूध्द कायम मनाई हुकूम अशा प्रकारे देण्यात यावा की, प्रतिवीदी नं. 01 ते 03 यांनी मौजे मरगळवाडी, ताः—गंगाखेड, जिः—परभणी मधिल सर्वे / गट क्रं. 303 / 7 मधिल एकुण क्षेत्रफळ 50 आर जे संपुर्ण वादी यांच्या नावाचे आहे. याक्षेत्रामध्ये दोन तुकडे आहे. यापैकी एक तुकडा 11 आरचा असुन त्यावर प्रतिवादी क्रं. 03 यांनी अतिक्रमण केलेले आहे. ज्याची चतुःसिमा पुर्वेस— बालासाहेब देविदास मुंढे यांचे शेत, पश्चिमेस— प्रतिवादी क्रं. 03 .निवृत्ती रामराव मुंढे यांचे शेत, दक्षिणेस— नदी, उत्तरेस— प्रतिवादी क्रं. 03 निवृत्ती रामराव मुंढे व बालासाहेब देविदास मुंढे यांचे शेत, मौजे मरगळवाडी, ताः—गंगाखेड, जिः—परभणी, यात कसल्याही प्रकारची अडी हरकती व विहीरीचे बांधकाम करू नये.

सत्य शपथेवर पुन्हा सांगतो की, प्रतिवादी क्रं. 03 यांनी प्रतिवादी क्रं. 02 यांना चुकीची माहीती व कागदपत्रे देवुन पंचायत समिती अंतर्गत सिंचन विहीरीचे काम अतिक्रमीत केलेल्या शेतात करीत आहे. म्हणुन वादींचे भावांनी अर्ज केले होते परंतु सदरील अर्जाची दखल घेण्यात आली नाही. दिः—17 / 10 / 2023 रोजी उपविभागीय अधिकारी साहेब, उपविभागीय अधिकारी कार्यालय, गंगाखेड जिः—परभणी येथे अर्ज दिले होते परंतु त्यांनीसुध्दा कसलीही कार्यवाही केलेली नाही.

सत्य शपथेवर पुन्हा सांगतो की, दिः—17 / 10 / 2023 रोजी प्रतिवादी क्रं. 03 हे आमच्या मालकीच्या शेतामध्ये परस्पर विहीर पाडत

असल्याबाबात वादीच्या भावां तर्फे पोलिस स्टेशन गंगाखेड येथे तकार दिली होती. परंतु त्यांनी कसलीही कार्यवाही न केल्यामुळे वादीच्या भावांनी दिः–08/11/2023 रोजी मा. गट विकास अधिकारी साहेब, पंचायत समिती गंगाखेड प्रतिवादी कं. 02 यांच्या कडे तकारी दिली. त्यांनंरत सदरील तकारीचे कसलेही निवारण न केल्यामुळे व वादीने प्रतिवादी कं. 03 यास सदरील अतिकमण केलेल्या जागेवर विहीरीचे कसलेही बांधकाम न करण्याबाबत विनंती केली असता प्रतिवादी कं. 03 याने स्पष्ट नकार दर्शविला म्हणुन वादीसर प्रस्तुतचे वादपत्र सादर करण्याचे कारण घडले आहे.

मी सत्य शपथेवर पुन्हा कथन करतो की, मी सदर वादपत्रासेबत काही महत्वाची कागदपत्रे दाखल केलेली आहे. त्यांना निशानी कमांक देण्यात यावे. सबब हे सरतपासाचे शपथपत्र देत आहे.

दिनांकः– 28 /07 /2026 प्रतिज्ञक,

गोविंद पि. नरहरी मुंढे,

राः–मरगळवाडी,ता.गंगाखेड,जि.परभणी.

## सत्यापन

मी वादी **गोविंद पि. नरहरी मुंढे,** वयः– 50 वर्ष, धंदाः– शेती, राः–मरगळवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी शपथपुर्वक निवेदन करतो की,वरिल सरतपासातील शपथपत्रातील सर्व माहिती ही माझ्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे. करिता आज रोजी पालम येथे तसदिक करण्यात आली.

दिनांकः– 28/07/2026 प्रतिज्ञक,

गोविंद पि. नरहरी मुंढे,

राः–मरगळवाडी,ता.गंगाखेड,जि.परभणी

AFFIDAVIT

Solemnly affirmed before me

by Govind Narhari Mundhe

Age 50 years occ. Agri R/o Margalwadi Tq Gangakhed.

Who is identified before me

by Adv. L. R. Kendre

Whom I Know Personally

28/07/2026

I. D.

Kendre Adv.